# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## समाज विकास विभाग

### ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत घरे देणेबाबत.

## शुद्धीपत्रक/प्रथम मुदतवाढ

मा.आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार दि.२३/०८/२०१९ ते दि.०६/०९/२०१९ पर्यंत मुदत वाढ देऊन घर मागणी अर्जातील खालील अटी व शर्ती मध्ये बदल करण्यात आला आहे.

ठामपा/पिआरो/समाज विकास विभाग/५९६ /२०१९-२० अन्वये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत घरे देण्याबाबत जाहिरात देण्यात आली होती. ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता वाढीव मुदत देण्यात आली असुन या योजनेचे अर्ज दि.२३/०८/२०१९ ते दि.०६/०९/२०१९ पर्यंत ठाणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभाग (मुख्यालय), तळमजला, सरसेनानी जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. परिपुर्ण भरलेले अर्ज दि.२३/०८/२०१९ ते दि.०६/०९/२०१९ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत अर्ज समाज विकास विभाग मुख्यालय या कार्यालयात स्विकारण्यात येतील. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

मा.आयुक्त सो. यांच्या आदेशान्वये अटी व शर्तीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | पुर्वीच्या अटी व शर्ती | बदल करण्यात आलेल्या अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | दिव्यांगाकरिता बी.एस.यु.पी. योजने अंतर्गत घर मागणी अर्जाचे वितरण व स्विकारणे कालावधी हा दि.०८/०८/२०१९ ते दि.२२/०८/२०१९ रोजी सायं. ५ पर्यंत. | दिव्यांगाकरिता बी.एस.यु.पी. योजने अंतर्गत घर मागणी अर्जाचे वितरण व स्विकारणे कालावधी हा दि.२३/०८/२०१९ ते दि.०६/०९/२०१९ रोजी सायं. ५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. |
| २ | अर्जदाराचे दिव्यांगत्व किमान ८०% असावे. | अर्जदाराचे दिव्यांगत्व किमान ४०% किंवा त्यापेक्षा जास्त असावे. तसेच लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करताना दिव्यांगाच्या टक्केवारीनुसार ८०% व ८०% पेक्षा जास्त दिव्यांगत्व असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल. |
| ३ | १ लाखापर्यंत उत्पन्न असल्याबाबत मा.तहसिलदार यांचेकडे उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे. | १ लाखापर्यंत उत्पन्न असल्याबाबत मा.तहसिलदार यांचेकडे उत्पन्नाचा दाखला किंवा पिवळे / केशरी रेशनकार्ड जोडणे आवश्यक आहे. |
| ४ | अर्जदार किंवा त्याची पती/पत्नी किंवा त्यांची मुले यांच्या नावे भारतात कुठेही घर नसावे त्याबाबतचे प्रतिज्ञा पत्र अर्जासोबत सादर करावे लागेल. | अर्जदार किंवा त्याची पती/पत्नी किंवा त्यांची मुले यांच्या नावे ठाणे जिल्हा, मुंबई जिल्हा क्षेत्रात कुठेही घर नसावे त्याबाबतचे प्रतिज्ञा पत्र अर्जासोबत सादर करावे लागेल. |

**टिप :** १) छापील अर्जावर अनुक्रमांक देण्यात आला असल्याने सदर अर्जाचाच स्विकार केला जाईल. झेरॉक्स अर्जाचा स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२) यापुर्वी अर्ज वितरीत झालेले व जमा केलेल्या व्यक्तींनी पुन:श्च अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

सही/-
उपायुक्त,
समाज विकास विभाग
ठाणे महानगरपालिका, ठाणे